महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
CIN of The Corporation
U92100MH1977SGC019882
दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५.
दुरध्वनी क्र. २८४० १५३३, २८४० १७५५, २८४९ ७५०० फॅक्स : २८४० ०७३४

क्रमांक:कलागारे-२०२२/सु.द./९३
दिनांक:०१.०७.२०२२

## कार्यालयीन आदेश

दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या परिसरात विविध आकारमानाचे १५ कलागारे व पोलिस स्टेशन, बिल्डिग कॉम्प्लेक्स, हॉस्पिटल लोकेशन, कोर्ट, हेलिपॅड, मंदिर तसेच खुली मैदाने अशी चित्रीकरण स्थळे आहेत. वेळोवेळी महामंडळाच्या संचालक मंडळाने पारित केलेल्या ठरावान्वये कलागारे व बाह्य चित्रीकरण स्थळांची भाडे निश्चिती करण्यात आली आहे.

महामंडळातील १५ कलागारे व ७० बाह्य चित्रीकरण स्थळांची २०१८ पासून दरवाढ झालेली नाही. विद्यमान दररचनेमध्ये कलागारे व बाह्य चित्रीकरण स्थळे यांचा आकार व त्यांचे दर यामध्ये असलेली असमानता दूर करणे, त्याचप्रमाणे महामंडळातील कलागारे व बाह्य चित्रीकरण स्थळे यांचे दर महामंडळाच्या परिसराबाहेरील कलागारे व बाह्य चित्रीकरण स्थळे यांच्यापेक्षा कमी आहे तसेच सदर दर बाजारदर (Market Rate) भावापेक्षा कमी आहेत. तसेच प्राप्त परिस्थितीत सदरची दरवाढ करणे अपरिहार्य आहे.

व्यवसायिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी व महामंडळाच्या आर्थिक उत्पन्नावर होणारा परिणाम विचारात घेऊन सध्या आकारण्यात येणाऱ्या भाडे आकारणीत तसेच आकारणी पध्दतीत सुधारणा करण्याची बाब महामंडळाच्या विचाराधीन होती. तसेच सदर दरवाढ ही बाजार दरापेक्षा कमी आहे.

अ) महामंडळाने मूळ दर सामान्यीकरण करुन कलागारे क्र. १,२,३,४,१३,१४,१५, कोर्ट व हॉस्पिटल लोकेशन यांना भाडे शुल्क रु.१०/- प्रति चौ.फूट प्रतिदिन तसेच निर्मिती संस्थेला चित्रीकरण स्थळे / कलागारे यांच्याशी संलग्नित असलेल्या मेकअपरुम / प्रॉपर्टी रुमचे पॅकेज तयार केले असल्यामुळे कलागारे क्र.५,७,८,९,१०,११,१२ व १६ यांना रु.१२ प्रति चौ.फूट प्रतिदिन शुल्क नवीन वाढीव भाडेदर खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आला आहे.

ब) महामंडळाने वेळोवेळी केलेल्या चौकशी व अभ्यासानुसार चित्रनगरीच्या बाहेरील बाह्य चित्रीकरण स्थळांचे आकारण्यात येणारे भाडे हे चित्रनगरीच्या बाह्य चित्रिकरण स्थळांच्या (Outdoor Locations) दरापेक्षा जास्त आहे. हा मुद्दा विचारात घेऊन चित्रनगरीमधील बाह्य चित्रीकरण स्थळांचे (Outdoor Locations) भाडे हे ०.५२ च्या प्रतिदिन प्रति चौरस फूट दरांनुसार खालीलप्रमाणे निश्चित केले आहेत.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

अ) कलागारांच्या दराचा तक्ता :

| Location | Size | Area (Sq Ft) | Existing Rate Till 30/06/2022 | Revised Rate from 01/07/2022 | Remarks |
|---|---|---|---|---|---|
| STUDIO - 1 | 87x50x35 | 4,350 | - | 43,500 | Presently on long term lease upto 15/11/2022 |
| STUDIO - 2 | 130x65x40 | 8,450 | | 84,500 | |
| STUDIO - 3 | 98x55x25 | 5,390 | - | 53,900 | Lease term expired on 30/06/2022 |
| STUDIO - 4 | 95x55x25 | 5,390 | | 53,900 | |
| STUDIO - 5 | 95x89x35 | 8,455 | 80,000 | 1,01,460 | |
| STUDIO - 7 | 130x80x35 | 10,400 | 90,000 | 1,24,800 | |
| STUDIO - 8 | 89x50x30 | 4,450 | 50,000 | 53,400 | |
| STUDIO - 9 | 89x50x30 | 4,450 | 50,000 | 53,400 | |
| STUDIO - 10 | 89x50x30 | 4,450 | 50,000 | 53,400 | |
| STUDIO - 11 | 140x50x30 | 7,000 | 65,000 | 84,000 | |
| STUDIO - 12 | 89x50x30 | 4,450 | 50,000 | 53,400 | |
| STUDIO - 13 | 50x40x30 | 2,000 | - | 20,000 | Presently on long term lease upto 31/07/2024 |
| STUDIO - 14 | 50x40x30 | 2,000 | - | 20,000 | |
| STUDIO - 15 | 50x40x30 | 2,000 | - | 20,000 | |
| STUDIO - 16 | 148x95x45 | 14,060 | 1,10,000 | 1,68,720 | |
| COURT & COURT EXTERIOR | - | 1,824 | 22,000 | 35,000 | |
| | - | 24,000 | | | |
| HOSPITAL | - | 4,000 | 48,000 | 48,000 | |

ब) बाह्य चित्रिकरण स्थळांच्या दराचा तक्ता :

| Sr.No. | Location Name | Total Area (SQ. FT.) | Existing Rate Till 30/06/2022 | Revised Rate From 01/07/2022 |
|---|---|---|---|---|
| 1 | POLICE STN. | 4,500 | 22,000 | 23,100 |
| 2 | BUILDING COMPLEX | - | 22,000 | 23,100 |
| 3 | CARPARKING GARDEN, WATER FOUNTAIN & MULTIPURPOSE MINI HALL | 3240 | 30,000 | 40,000 |
| | | 1841 | | |

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

| Sr.No. | Location Name | Total Area (SQ. FT.) | Existing Rate Till 30/06/2022 | Revised Rate From 01/07/2022 |
|---|---|---|---|---|
| 4 | FLAG POLE ROAD WITH DOME PILLAR CORRIDOR & WOODEN REST HOUSE | 20,000 | 42,000 | 42,000 |
| 5 | PLAY GROUND | 3,920 | 30,000 | 40,000 |
| | STAFF QUARTERS ROAD | 8,000 | | |
| | JT. MD BUNGALOW | 780+4510 | | |
| 6 | HELIPAD UP | 70,000 | 34,650 | 36,400 |
| | HELIPAD DOWN | | | |
| 7 | RES. GARDEN | 58,362 | 40,000 | 40,000 |
| | LAKE VIEW GARDEN | | | |
| 8 | TEMPLE | 38,500 | 38,000 | 38,000 |
| | TEMPLE MAIDAN | | | |
| 9 | BAPU NAGAR TO TEMPLE ROAD WITH TEMPLE VALLY | 48,000 | 34,650 | 34,650 |
| 10 | BAPU NAGAR TO HELIPAD ROAD | 42,000 | 34,650 | 34,650 |
| | HILL VIEW | 7,225 | | |
| 11 | ROCK ON - 2 MAIDAN | 47,600 | 30,000 | 30,000 |
| 12 | SAI MAIDAN | 32,300 | 23,100 | 23,100 |
| 13 | WELCOME MAIDAN | 57,000 | 23,100 | 29,640 |
| 14 | OPP. WELCOME MAIDAN | 55,100 | 23,100 | 28,652 |
| 15 | DHABA | 10,800 | 15,000 | 23,100 |
| 16 | JOSH MAIDAN 1 | 1,40,000 | 23,100 | 72,800 |
| | JOSH MAIDAN 2 | | 23,100 | |
| 17 | JOKER MAIDAN | 57,500 | 30,258 | 30,258 |
| 18 | WHISTLING WOOD MAIDAN - 1 | 39,000 | 23,100 | 23,100 |
| 19 | WHISTLING WOOD MAIDAN - 2 | 36,100 | 23,100 | 23,100 |
| 20 | WHISTLING WOOD MAIDAN - 3 | 59,200 | 23,100 | 30,784 |

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

| Sr.No. | Location Name | Total Area (SQ. FT.) | Existing Rate Till 30/06/2022 | Revised Rate From 01/07/2022 |
|---|---|---|---|---|
| 21 | OPP WHISTLING WOOD MAIDAN | 35,000 | 23,100 | 23,100 |
| 22 | OPP. WHISTLING WOOD MAIDAN ROAD | 33,000 | 23,100 | 23,100 |
| 23 | WHISTLING WOOD COMPLEX | 2,39,580 | 23,100 | 23,100 |
| 24 | VISHNU MAIDAN - 1 | 83,250 | 23,100 | 43,290 |
| 25 | VISHNU MAIDAN - 2 | 15,600 | 23,100 | 23,100 |
| 26 | OPP. RELIANCE MEDIA NO.-1 | 32,300 | 23,100 | 23,100 |
| 27 | OPP. RELIANCE MEDIA NO. 2 | 25,600 | 23,100 | 23,100 |
| 28 | GATE NO.1 TO ADLAB ROAD / BUS STOP | 90,000 | 23,100 | 46,800 |
| 29 | WAGHDEVI MANDIR | 38,500 | 23,100 | 23,100 |
| 30 | KALIYA MAIDAN-1 | 57,600 | 24,645 | 29,952 |
| 31 | KALIYA MAIDAN-2 | 52,200 | 23,100 | 27,144 |
| 32 | KALIYA MAIDAN-3 | 40,762 | 23,100 | 23,100 |
| 33 | KALIYA MAIDAN STAGE | 37,422 | 23,100 | 23,100 |
| 34 | KALIYA MAIDAN JUNCTION | 33,000 | 23,100 | 23,100 |
| 35 | OPP. POLICE STATION | 61,600 | 32,312 | 32,312 |
| 36 | CHURCH /CHWAL | 54,000 | 23,100 | 28,080 |
| 37 | VILLAGE HOUSE BIG AND SMALL SURROUNDING AREA | 6,160 | 15,000 | 23,100 |
| 38 | ZUNKA BHAKAR MAIDAN | 21,705 | - | 23,100 |
| 39 | WADA VILLAGE | 75,400 | 23,100 | 39,208 |
| 40 | NEAR GAUTAM NAGAR | 28,314 | 23,100 | 23,100 |
| 41 | BACK GATE ROAD | 7,000 | 23,100 | 23,100 |
| 42 | OFFICE ROAD | 7,000 | 23,100 | 23,100 |
| 43 | NEW CAR PARKING | 3,240 | 23,100 | 23,100 |
| 44 | BASKET BALL MAIDAN | 23,000 | 23,100 | 23,100 |
| 45 | CANTEEN | 2,000 | - | 23,100 |

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

| Sr.No. | Location Name | Total Area (SQ. FT.) | Existing Rate Till 30/06/2022 | Revised Rate From 01/07/2022 |
|---|---|---|---|---|
| 46 | ADDITIONAL STUDIO COMPLEX ROAD | 28,600 | 23,100 | 23,100 |
| 47 | MUKTI BANDHAN MAIDAN | 3,340 | 23,100 | 23,100 |
| 48 | MRUTUNJAY MAIDAN | 54,000 | 23,100 | 28,080 |
| 49 | SALTANANT VALLY 1 | 56,000 | 23,100 | 29,120 |
| | SALTANANT VALLY -2 | | | |
| 50 | SHIV MAIDAN | 60,900 | 23,100 | 31,668 |
| 51 | BAPU NAGAR | 38,000 | 23,100 | 23,100 |
| 52 | OPP. BAPU NAGAR | 32,860 | 23,100 | 23,100 |
| 53 | KHANDALA GHAT | 48,000 | 23,100 | 24,960 |
| | KHANDALA VALLY | | | |
| 54 | KHANDALA TOP | - | 23,100 | 23,100 |
| 55 | VIGHNAHARTA MAIDAN | 45,600 | 23,100 | 23,712 |
| 56 | FARISHTE MAIDAN | 54,412 | 23,100 | 28,294 |
| 57 | SAMRAT MAIDAN | 36,675 | 23,100 | 23,100 |
| 58 | B.N.H.S. GATE | 37,400 | 23,100 | 23,100 |
| 59 | LAKE UP | 32,870 | 27,300 | 27,300 |
| 60 | LAKE DOWN | 30,056 | 27,300 | 27,300 |
| 61 | APPU PAPPU MAIDAN NO. 1 | 28,200 | 23,100 | 23,100 |
| 62 | APPU PAPPU MAIDAN NO. 2 | 45,000 | 23,100 | 23,400 |
| 63 | APPU PAPPU MAIDAN NO. 3 | 61,600 | 23,100 | 32,032 |
| 64 | LINK ROAD-1 | 84,360 | 24,740 | 43,867 |
| 65 | LINK ROAD-2 | 88,000 | 23,100 | 45,760 |
| 66 | LAKE ROAD | 57,200 | 23,100 | 29,744 |
| 67 | STUDIO COMPLEX | - | 23,100 | 23,100 |
| 68 | OUTDOOR ROAD | - | 23,100 | 23,100 |
| 69 | OPP. MRUTUNJAY MAIDAN ROAD | 19,800 | 23,100 | 23,100 |
| 70 | OPP. STUDIO NO. 3 & 4 ROAD | 4,000 | 23,100 | 23,100 |

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

१. उपरोक्त भाडे हे कर विरहित असून भाडे आकारताना वेळोवेळी लागू असलेल्या कराची परिगणना करण्यात यावी.
२. सदर भाडयामध्ये विद्युत, वातानुकूलिन व पाणीपट्टी व प्रॉपर्टी शुल्क यांचा समावेश नाही.

**संचालक मंडळाच्या दि.२९/०६/२०२२ रोजी झालेल्या १५९/०३ अन्वये निर्मिती संस्थांना खालील अटी व शर्ती लागू करण्यात आलेल्या आहेत.**

१. निर्मिती संस्थांना त्यांच्या संस्थेमार्फत निर्माण होणाऱ्या हिंदी / मराठी मालिकेच्या चित्रीकरणाकरीता त्यांच्या मागणीप्रमाणे १ वर्षापर्यंतच्या कालावधीसाठी आरक्षण देण्यात येत असून त्यांना त्यासाठी खालील सवलती देण्यात येतात. ही सवलत जशीच्या तशी पुढेही लागू राहील.

| अ.क्र. | आरक्षण कालावधी | सुधारीत तरतूद |
|---|---|---|
| १ | ३ ते ६ महिने | १० दिवस |
| २ | ७ ते ९ महिने | २० दिवस |
| ३ | १० ते १२ महिने | ३० दिवस |

२. कलागारांचे भाडे प्रतिदिन (२४ तास) तत्वावर आरक्षण देऊन अ मध्ये विहित करण्यात आलेले भाडे आकारण्यात येईल.
३. दररोजची गणना सकाळी ०७:०० ते दुसऱ्या दिवशी सकाळी ०६:५९ पर्यंतच्या दिवसावर आधारित आहे. परवानाधारकाने वेळ संपण्यापूर्वी ती जागा रिकामी करणे आवश्यक आहे.
४. चित्रिकरण स्थळांचे आरक्षण हे अ मधील " प्रथम विहित भाडे भरणाऱ्यास प्रथम आरक्षण " या तत्वावर करण्यात येईल. कोणत्याही प्रकारचे Tentative / Token आरक्षण दिले जाणार नाही.
   (i) बाह्यचित्रिकरण स्थळांची भाडे आकारणी २४ तास या परिमाणाने करण्यात येईल.
   (ii) मात्र एखाद्या निर्मिती संस्थेस आरक्षित केलेल्या मूळ बाह्य चित्रिकरण स्थळाशिवाय अन्य चित्रिकरण स्थळावर चित्रिकरण करावयाचे झाल्यास त्या चित्रिकरण स्थळावर चित्रिकरणासाठी ०४ तासासाठी ५०% भाडे व ०४ तासापेक्षा जास्त कालावधीसाठी पूर्ण दराने भाडे आकारण्यात येईल.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

(iii) तसेच चित्रनगरीच्या परिसरातील उपलब्ध रस्त्यांवरील (इतर चित्रिकरणास बाधा न पोहचता) प्रवासदृश्यासाठी (Passing Shot) ०४ तासासाठी ५०% भाडे व ०४ तासापेक्षा जास्त कालावधीसाठी पूर्ण दराने भाडे आकारण्यात येईल.

(iv) एका चित्रिकरण स्थळावरुन दुसऱ्या चित्रिकरण स्थळावर (Shifting) करण्यापूर्वी आरक्षण कक्षामध्ये चित्रिकरण स्थळाचे आरक्षण करणे आवश्यक आहे. परस्पर चित्रिकरण स्थळावर चित्रिकरणाकरिता गेल्यास दिडपट भाडे आकारणी करण्यात येईल.

५. सेट उभारणीसाठी आणि सेट तोडण्यासाठी प्रत्यक्ष कितीही कालावधी लागला तरी सेट उभारणीसाठी आणि सेट तोडण्यासाठी प्रत्येकी २ दिवस असे एकूण ४ दिवस किंवा प्रत्यक्ष लागलेला कालावधी यापैकी जो कालावधी कमी असेल त्या कालावधीसाठी मूळ भाड्याच्या ५०% सवलत देय राहील.

६. वरील सवलतीचा कालावधी (जास्तीत जास्त ०४ दिवस) वगळून इतर काळासाठी (सेट उभारणी (Set Construction) / सेट तोडणे (Set Dismantle) / सेटमध्ये बदल करणे (Set Changing) / चित्रिकरण चालू नसलेला कालावधी (Set Standing) / सेट विद्युतीकरण (Set Lighting) व चित्रिकरण कालावधीचे पूर्ण दराने भाडे आकारण्यात येईल.

७. कलागारे तसेच दिर्घमुदतीचे आरक्षण असलेल्या बाह्यचित्रिकरण स्थळांना करण्यात येणारा विद्युत पुरवठा हा प्रत्यक्ष वापरण्यात आलेले युनिट विचारात घेऊन आकारण्यात येईल.

८. प्रत्येक कलागारांमध्ये असलेल्या वातानुकूलन यंत्रणेसाठी विद्युत विभागाकडून विहित करण्यात आलेल्या दराप्रमाणे शुल्क आकारण्यात येईल.

(i) निर्मिती संस्थांकडून कलागारे व बाह्यचित्रिकरण स्थळांसाठी १ वर्षापेक्षा कमी कालावधीच्या आगाऊ आरक्षणासाठी एकुण भाड्याच्या ५०% रक्कम आगाऊ (Advance) घेण्यात यावी.

(ii) १ वर्षाच्या आरक्षणासाठी (Package Deal) एकूण भाड्याच्या २५% सुरक्षा अनामत रक्कम व २०% आगाऊ घेण्यात यावी.

(iii) पाणीपट्टी शुल्कापोटी अनामत रक्कम रु. ८०,०००/- आगाऊ (Advance) घेण्यात यावी.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

९. निर्मिती संस्थांकडून चित्रिकरण स्थळांवरील आरक्षण रद्द केल्यास,

(i) १० दिवसांपुर्वी आरक्षण रद्द करण्याचा प्रस्ताव दिल्यास संपुर्ण आरक्षण कालावधीची १०% भाडे रक्कम,

(ii) १० ते ५ दिवसांपुर्वी आरक्षण रद्दचा प्रस्ताव दिल्यास संपुर्ण कालावधीची २५% भाडे रक्कम,

(iii) ५ दिवस अगोदर प्रस्ताव दिल्यास संपुर्ण आरक्षण कालावधीची ५०% भाडे रक्कम रद्द आकारणी म्हणून आकारण्यात येईल.

मात्र आरक्षण रद्द केल्यानंतर सदर चित्रिकरण स्थळावरील आरक्षण रद्द केलेल्या कालावधीमध्ये दुसऱ्या निर्मिती संस्थेचे आरक्षण प्राप्त झाल्यास किंवा यापूर्वी आरक्षण रद्द करणाऱ्या निर्मिती संस्थेने आरक्षण मिळवून दिल्यास जेवढया कालावधीसाठी नव्याने आरक्षण प्राप्त झाले आहे, तेवढया कालावधीसाठी आरक्षण रद्द शुल्क म्हणून १०% रक्कम कपात करण्यात येईल. उर्वरित कालावधीसाठी वरील (i) ते (iii) प्रमाणे रद्द आकारणी करण्यात येईल.

१०. (i) मराठी भाषेतील चित्रपट, दूरचित्रवाणी मालिका, Music Album, Short Film, यांच्या चित्रिकरणासाठी १ वर्षाच्या कालावधीपर्यंत भाड्याच्या ५०% सूट देण्यात येईल.

(ii) तसेच मराठी भाषेतील Reality Show, Game Show, Dance Show यासारख्या कथाबाह्य/कथानक नसलेल्या कार्यक्रमांच्या चित्रिकरणासाठी १ वर्षाच्या कालावधीपर्यंत भाड्याच्या २५% सूट देण्यात येईल.

११. निर्मिती संस्थांकडून आरक्षित करण्यात येणाऱ्या चित्रिकरण स्थळांवर त्यांच्याच निर्मिती संस्थेचे इतर चित्रपट / मालिका यांचे चित्रिकरण करण्यात येत असल्यास :-

(i) निर्मिती संस्थेकडून दिर्घकालासाठी एखाद्या मालिकेसाठी/चित्रपटासाठी आरक्षित केलेल्या चित्रिकरण स्थळांवर त्याच निर्मिती संस्थेच्या दुसऱ्या मालिकेचे/चित्रपटाचे चित्रिकरण करणे अनुज्ञेय राहिल.

(ii) वरील आरक्षण पद्धतींचा लाभ घेताना सदर निर्मिती संस्थेस उपरोक्त क्रमांक १ मधील सवलती अनुज्ञेय राहणार नाहीत.

(iii) करारधारकाने सदर चित्रिकरण स्थळ दुसऱ्या निर्मिती संस्थेस परस्पर भाड्याने देऊ नये. जर असे केल्याचे निदर्शनास आल्यास सदर बाब कराराचा भंग असल्याचे समजून करारात नमूद असल्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल **किंवा** मूळ करार धारकाकडून

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दुसऱ्या संस्थेस चित्रिकरण स्थळ भाड्याने दिलेल्या कालावधीसाठी दिड पटीने भाडे आकारण्यात येईल, याबाबतचा अंतिम निर्णय व्यवस्थापकीय संचालक यांचा राहील.

(iv) एखाद्या निर्मात्यास वरील प्रमाणे दिर्घकालीन आरक्षित असलेल्या जागेवर चित्रिकरण करावयाचे असल्यास सदर निर्मात्याने मूळ करार धारकाकडून "ना हरकत प्रमाणपत्र" आणून महामंडळाच्या कलागारे विभागांतर्गत आरक्षण कक्षातून रितसर आरक्षण करावे. त्यासाठी सदर संस्थेकडून महामंडळाच्या प्रचलित नियमाप्रमाणे त्या स्थळाचे भाडे आकारण्यात येईल.

१२. एका बाह्य चित्रिकरण संस्थेकडून दुसऱ्या चित्रिकरण संस्थेकडे सेट हस्तांतरण करताना विहित केलेले रु. ५ लक्ष + लागू असलेले कर हे हस्तांतरण शुल्क लागू राहील.

१३. सर्व देयके प्रत्येक महिन्याच्या २० तारखेपर्यंत तयार केली जातील आणि निर्मिती संस्थेने सदर देयकाची रक्कम दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत भरावी.

१४. सबलेटिंगला काटेकोरपणे परवानगी नाही.

१५. चित्रनगरीच्या मालमत्तेचे नुकसान होणार नाही याची खात्री करणे ही निर्मिती संस्थेची जबाबदारी असेल अन्यथा अधिकाऱ्यांना योग्य वाटेल त्याप्रमाणे दंडास पात्र असेल.

१६. निर्मिती संस्थेची मालमत्तेची आणि परिसराची योग्य वर्तणूक तपासण्यासाठी कोणत्याही नियोजित/अनियोजित भेटी आयोजित करण्यात अधिकाऱ्यांना सहकार्य करेल.

१७. अग्निशमन विभाग, MCGM, पोलीस अधिकारी, स्फोटक विभाग इत्यादी संबंधित सक्षम प्राधिकरणांच्या लेखी परवानगीशिवाय इमारतीच्या आवारात किंवा कोणत्याही बाहेरील ठिकाणी आग लागण्याची किंवा ब्लास्टिंगची परवानगी दिली जाणार नाही.

१८. या प्राधिकरणांकडून जारी केलेल्या परवानगीची खात्री केल्यानंतर, MFSCDCL लिखित परवानगी देऊ शकते जर क्रियाकलाप पक्षाद्वारे नियंत्रित पद्धतीने केले जातात.

१९. लेखी परवानगीशिवाय अशी कामे केल्याने पक्षकार दिवाणी किंवा फौजदारी कारवाईस जबाबदार असेल, दंडात्मक कारवाईसह किमान रु.१,००,०००/- पर्यंत दंड (Penalty) आकारण्यात येईल.

२०. कोणत्याही चित्रिकरण स्थळासाठी/ कलागारांसाठी कार्यक्रम (Event) करण्यासाठी परवानगी मागितल्यास, महामंडळ चित्रिकरणाच्या दिवसांचे दुप्पट भाडे आकारण्यात येईल.

२१. वर्ष २०१५ च्या संचालक मंडळाच्या ठरावानुसार, हेलिकॉप्टर लँडिंग शुल्क सद्या रु.२१,०००/- + GST लागू करण्यात आले आहे. हे शुल्क २०% वाढवून सुधारित रु.२५,०००/- + GST करण्यात येत आहे.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

<u>महामंडळाच्या जबाबदाऱ्या:</u>

१. निर्मिती संस्थांच्या नुकसानीमुळे आवश्यक असलेल्या संरचनात्मक दुरुस्ती करणे.
२. कलागारांच्या भिंतींना तात्पुरता दिलेला पांढरा रंग (White Washing) आणि निर्मिती संस्थाशी संबंधित नसलेला इतर कचरा काढून टाकणे.
३. जेव्हा आवश्यक असेल तेव्हा पाईप बदलणे आणि प्लंबिंग करणे.
४. जेव्हा आवश्यक असेल तेव्हा अंतर्गत आणि बाह्य विद्युत वायरिंग आणि संबंधित देखभाल करणे.
५. रस्ते आणि जवळच्या दर्शनी भागाची देखभाल करणे.
६. झाडे पडणे, इतर नैसर्गिक अडथळे यामुळे येणारे कोणतेही अडथळे दूर करणे. परंतु अशा घटनांमधून बांधलेल्या सेटला झालेल्या कोणत्याही हानीसाठी महामंडळ जबाबदार राहणार नाही.
७. "नैसर्गिक आपत्ती" किंवा आपत्कालीन परिस्थितीत बांधलेल्या परिसर/ सेटला कोणत्याही नुकसानीसाठी महामंडळ जबाबदार राहणार नाही.

<u>निर्मिती संस्थेच्या जबाबदाऱ्या:</u>

१. निर्मिती संस्थांच्या चित्रिकरणाच्या दरम्यान झालेल्या कोणत्याही नुकसानाची परिसराची दुरुस्ती आणि देखभाल करणे.
२. परवानाकृत परिसर आणि परिसराकडे जाणारे रस्ते आणि उर्वरित मालमत्तेसह जवळपासच्या भागांची काळजी घेणे.
३. परिसरामध्ये कोणताही उपद्रव होऊ नये आणि केवळ त्यांना दिलेल्या क्षेत्रातच काम करावे, इतरत्र चित्रिकरण करुन नये.
४. बांधलेला सेट आणि त्यांच्यामध्ये बदल केल्यामुळे झालेली मोडतोड इत्यादी काढून टाकणे आणि वापरापूर्वीच्या स्थितीतील जागा महामंडळास सुपूर्द करणे.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

५. चित्रिकरणासाठी उपलब्ध करुन दिलेल्या स्थळावरील प्रत्येक बाबींची जबाबदारी घेऊन संबंधित कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्यांचे आणि कोणताही गैरप्रकार न करता चित्रिकरण शांततेने पार पाडले जाईल, याची दक्षता घ्यावी.

६. चित्रनगरी परिसरात कोणत्याही प्रकारचा कचरा किंवा मद्यपान करण्याची परवानगी नाही. कोणताही क्रू मेंबर अशा बाबींमध्ये गुंतलेला आढळल्यास त्याला काळ्या यादीत (Black List) टाकले जाईल आणि परवानाधारकाची तत्काळ निष्कासन केले जाईल.

तसेच चित्रिकरण स्थळांच्या भाडेनिश्चितीच्या संदर्भात व देण्यात येणाऱ्या सुविधांच्या संदर्भात यापूर्वी अस्तित्वात असलेले सर्व ठराव अधिक्रमित करण्यात येत आहेत.

*** टिप :**

**१. कलागारे क्र. ३ व ४ मे. नीला फिल्म प्रोडक्शन्स प्रा. लि. यांना भाडेतत्वावर दि.३०/०६/२०२२ पर्यंत देण्यात आले आहे. सदर करारनाम्याची मुदत दि.३०/०६/२०२२ रोजी समाप्त झाली असून सदर करारास मुदतवाढ देण्याबाबत अथवा नवीन निर्मिती संस्थेस देण्याबाबत कलागारे क्र. ३ व ४ या कलागारांना संचालक मंडळाच्या दि.२९/०६/२०२२ रोजीच्या १५९/०३ अन्वये सुधारीत दराने दि.०१/०७/२०२२ पासून नवीन भाडेदर लागू राहिल.**

**२. कलागारे क्र. १ व २ मे. नीला फिल्म प्रोडक्शन्स प्रा. लि. यांना भाडेतत्वावर देण्यात आले आहे. सदर करारनाम्याची मुदत संपल्यानंतर सदर दोन्ही कलागारे जर महामंडळाच्या ताब्यात आल्यास कलागारे क्र. १ व २ या कलागारांना संचालक मंडळाच्या दि.२९/०६/२०२२ रोजीच्या १५९/०३ अन्वये सुधारीत दराने दि.०१/०७/२०२२ पासून नवीन भाडेदर लागू राहिल.**

**३. कलागारे क्र. १३,१४ व १५ मे. मॉस युटीलीटी प्रा. लि. यांना भाडेतत्वावर देण्यात आले आहे. सदर करारनाम्याची मुदत संपल्यानंतर सदर तीनही कलागारे जर महामंडळाच्या ताब्यात आल्यास कलागारे क्र. १३,१४ व १५ या कलागारांना संचालक मंडळाच्या दि.२९/०६/२०२२ रोजीच्या १५९/०३ अन्वये सुधारीत दराने दि.०१/०७/२०२२ पासून नवीन भाडेदर लागू राहिल.**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दि.२९/०६/२०२२ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीमधील १५९/०३ अन्वये मान्य झालेल्या उपरोक्त अ आणि ब तक्त्यातील कलागारे व बाह्य चित्रिकरण स्थळांचे भाडेदर दि. ०१.०७.२०२२ व त्यानंतर करण्यात येणाऱ्या आरक्षणासाठी लागू राहतील.

(विजय भा. भालेराव)
मुख्य प्रशासकीय अधिकारी
01/07/2022